माणूस किती जगतो, यापेक्षा तो कसा जगतो, यालाच महत्त्व आहे.
कुसुमाग्रज.

दैनिक
लोकक्रांतीचा आरंभ
# लोकआरंभ

dainiklokaarambh@gmail.com
LOK AARAMBH
संपादक:राहुल मारोतीराव वाईकर
कार्यकारी संपादक गोकुळ इंगोले

बीड/महाराष्ट्र वर्ष ३ रे | मंगळवार २२ एप्रिल २०२५ | अंक १३१ ● पाने ४ | RNI/MAHMAR/2022/84215 | किंमत २ रु










# वाल्मिक कराडवरुन भुजबळ - जरांगे पाटील आमनेसामने

## कराडने हत्या केल्या असतील तर त्यांची नावं, गाव, इतर माहिती पोलिसांना द्या



वाल्मिक कराडने हत्या केलेल्या असतील तर पोलिसांना सांगा, स्वत:कडे लक्ष वेधण्यासाठी हवेत वक्तव्य करू नका, असा टोला लगावत ज्येष्ठ नेते छगन भुजबळ यांनी मराठा आंदोलक मनोज जरांगे यांना सल्ला दिला आहे. वाल्मिक कराडच्या एन्काउंटर करण्याच्या बडतर्फ पोलीस अधिकारी रणजित कासले याच्या दाव्यावर बोलताना जरांगे पाटील यांनी वाल्मिक कराडने अनेक हत्या करून लोकांना संपवलं, खंडण्या मागितल्या, आता आपलं काम झालं आता याची गरज नाही असं वाटलं असेल त्यामुळे धनंजय मुंडे यांना कराडला संपवायचं असेल, असा आरोप केला आहे. त्यावर छगन भुजबळ यांनी ही प्रतिक्रिया दिली. कराडने हत्या केल्या असतील तर त्यांची नावं, गाव, इतर माहिती पोलिसांना द्या, उगच स्वत:कडे लक्ष वेधण्यासाठी हवेत वक्तव्य कशाला करता, असा नाव न घेता भुजबळांनी जरांगे यांना टोला लगावला आहे.

# सामाजिक सेवेचा पुरस्कार साखरे बोरगाव चे सुपूत्र अजिंक्य जगदाळे यांना जाहीर..

## अजिंक्य जगदाळे यांच्या कामाची युवा महाराष्ट्र फाउंडेशन ने घेतली दखल..

बीड प्रतिनिधी -

बीड जिल्ह्यातील साखरे बोरगाव चे सुपुत्र अजिंक्य जगदाळे हे सतत सामाजिक कार्यात अग्रेसर असतात. गोरगरिबांच्या अडचणीत धावून जाणारा अजिंक्य जगदाळे म्हणून ओळख निर्माण झालेली आहे. याच कामाची पावती म्हणून युवा महाराष्ट्र फाउंडेशनने त्यांच्या कार्याची दखल घेत त्यांना महाराष्ट्र भूषण पुरस्कार जाहीर करण्यात आलेला आहे. युवा महाराष्ट्र फाउंडेशन प्रत्येक वर्षी महाराष्ट्रातील सामाजिक कार्य तसेच अनेक क्षेत्रातील मान्यवरांचा पुरस्कार देत सन्मान करण्यात येतो यावर्षी बीड जिल्ह्यातील साखरे बोरगाव चे सुपुत्र अजिंक्य जगदाळे यांचे सामाजिक कार्याची दखल घेत हा पुरस्कार त्यांना जाहीर करण्यात आलेला आहे. गावामध्ये त्यांनी अनेक गोरगरिबांना मदती तसेच



अनेक प्रश्नांवर आवाज उठवत गावकऱ्यांना न्याय मिळवून देण्याचा प्रयत्न केलेला आहे. एक तरुण आणि तडफदार नेतृत्व म्हणून अजिंक्य जगदाळे यांच्याकडे पाहिले जाते. सामाजिक कार्य असो किंवा कोणतेही कार्य असले की अजिंक्य जगदाळे हे पुढे होऊन करतात. ते करत असलेल्या कामाची दखल घेत युवा महाराष्ट्र फाउंडेशन यांनी महाराष्ट्र भूषण सन्मान पुरस्कारसाठी निवड केली आहे. त्यांच्या कार्याची दखल घेत त्यांना युवा महाराष्ट्र फाउंडेशन यांनी महाराष्ट्र भूषण 2025 चा सन्मान पुरस्कार जाहीर केलेला आहे. यामध्ये अनेक दिगजांचा सन्मान सोहळा पार पडणार आहे. पुरस्कार वितरण 23 एप्रिल 2025 रोजी दुपारी बारा वाजता पार पडणार आहे. पुरस्कार वितरणासाठी पूजा राठोड अभिनेत्री, इलक्षी गुप्ता अभिनेत्री तानाजी चित्रपट, हसीनी सुधीर अभिनेत्री साउथ चित्रपट, रुचिरा जाधव अभिनेत्री लागीर प्रेमाचं, या पुरस्कार सोहळ्यासाठी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहे. हा गौरव बीड जिल्ह्यासाठी अत्यंत अभिमानास्पद आहे इतर समाजसेवकांसाठी प्रेरणादायी ठरणार आहे.

# चोरट्यांनी घर फोडून दीड लाखांचा ऐवज केला लंपास



गेवराई। प्रतिनिधी तालुक्यातील माणकापूर येथे चोरट्याने घराचे कुलूप तोडून आतमध्ये प्रवेश करत घरातील नगदी रक्कमेसह सोन्याचे दागिने असा एकुण १ लाख ६५ हजारांचा ऐवज लंपास केल्याची घटना (दि.१९) शुक्रवार रोजी घडली असून या प्रकरणी अज्ञात चोरट्यांविरोधात चकलांबा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. भागवत भाऊसाहेब जोगदंड (वय ४३) रा.माणकापूर यांच्या घराचे अज्ञात चोरट्याने कुलूप तोडून घरातील कपाटात ठेवलेले सोन्याचे दागिने, मनी मंगळसुत्र, १२ ग्रॅम वजनाचे तसेच नगदी रक्कम असा एकूण १ लाख ६५ हजारांचा ऐवज चोरून नेला आहे. या प्रकरणी भागत जोगदंड यांच्या फिर्यादीवरून चकलांबा पोलीस ठाण्यात अज्ञात चोरट्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे.

# माजलगावात ढाबा मालकचा खून बीड जिल्हा पुन्हा हादरला!

माजलगाव-(किशन भदर्गे): राष्ट्रीय महामार्ग-६१वरील माजलगाव -पाथरी मार्गावर असलेल्या माजलगाव शहरा पासुन ४किमी अंतरावर नागडगाव पाटी कॉर्नर वरील गावरान ढाबा आहे त्याचा मालक महादेव गायकवाड (५४वर्षे) रा.मंजरथ रोड माजलगाव यांच्या वर २०एप्रिल रोजीच्या संध्याकाळी ७:३० ढाब्यावर बसलेल्या माजलगाव तालुक्यातील आनंदगाव येथील ग्राहकांनी बीला च्या कारणाने डोक्यावर वार करून प्राणघातक हल्ला



केल्याची घटना घडली. या हल्ल्यात ढाबा मालकाचा मुलगा (२२वर्षे) याच्या वर पण हल्ला केल्याची माहिती समजली आहे दरम्यान अत्यावस्थ महादेव गायकवाड यांना माजलगाव शहरातील डॉ.गिलबिले यांच्या बायपास रोड वर असलेल्या संजीवनी हॉस्पीटल मधे दाखल केले होते. त्यानंतर काही तासाने संजीवनी हॉस्पीटल चे प्रमुख डॉ.ज्ञानेश्वर गिलबिले यांनी शेवटच्या टप्प्यात सल्ला दिला की,महादेव गायकवाड यांना संभाजीनगर येथे हलविले गरजेचे आहे, त्यावर महादेव गायकवाड यांना संभाजीनगर येथे हलवले असता एका खाजगी रुग्णालयात मृत्यू झाल्याचं कळविण्यात आले आहे तर मुलगा आशुतोष महादेव गायकवाड यांचे सिटी स्कैन करण्यात आले असुन त्याची प्रकृती गंभीर असल्याची माहिती मिळाली असून धाब्यावर मारहाण करणारे आरोपी रोहित शिवाजीराव थावरे राहणार आनंदगाव व इतर पाच यांच्याविरोधात अगोदर ३०७ चा गुन्हा दाखल करण्यात आला होता परंतु आता धाबा मालकाचा गंभीर हल्ल्यात मर्डर झाल्याने आरोपतांविरुद्ध ३०२ चा गुन्हा दाखल होईल असे माजलगाव ग्रामीण पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक बालक कोळी यांनी कळविले आह

# माजलगावातील वकिलाची करामत; जामीन मिळाल्याचे खोटे प्रमाणपत्र देऊन आरोपीला नेले पळवून

माजलगाव-(प्रतिनिधी) उच्च न्यायालयाकडून अंतरिम जामीन मिळाल्याचे खोटे प्रमाणपत्र देऊन ॲट्रॉसिटीच्या गुन्ह्यात ताब्यात घेतलेल्या आरोपीच्या अटकेला प्रतिबंध करत त्याला पळवून नेल्याचा प्रकार माजलगावात घडला. याप्रकरणी ॲड. प्रवीण अंभोरे, सुशील शेंडगे व रोहिदास उर्फ रुद्रा हरिभाऊ कुरे यांच्याविरुद्ध गुन्हा नोंद झाला आहे. तालुक्यातील पुनंदगाव येथील रोहिदास उर्फ रुद्रा हरिभाऊ कुरे याच्या विरोधात ॲट्रॉसिटीचा गुन्हा नोंद होता. व तो फरार होता. १७ एप्रिल रोजी फौजदार माकणे यांनी त्याला ताब्यात घेतले होते. यावेळी त्याने उच्च न्यायालयातून अंतरिम जामीन मिळाल्याचे सांगितले. त्यानंतर त्याने ॲड. प्रवीण अंभोरे यांना बोलावून घेतले. त्यांनीही ॲड. सुदर्शन सोळुंके यांच्यामार्फत उच्च न्यायालयातून जामीन मिळाल्याचे सांगितले. पोलिसांनी सोळुंके यांना फोन लावण्यास सांगितले असता त्यांचे सहायक म्हणून सुशील शेंडगे या वकिलांना फोन लावून दिला. त्यांनीही जामीन मिळाला असून, अद्याप आदेशाची प्रत मिळाली नसल्याचे सांगितले. त्यासाठी त्यांनी प्रमाणपत्रही दिले. त्यामुळे पोलिसांनी कुरे याला सोडून दिले. मात्र, संशय आल्याने दुसऱ्या दिवशी ॲड. सुदर्शन सोळंके यांना संपर्क केला असता त्यांनी या प्रकारचा पक्षकार माझ्याकडे आला नाही व शेंडगे नावाचा वकीलही आपल्याकडे काम करत नाही, असे सांगितले. त्यानंतर दोन वकील व आरोपींविरोधात खोटी माहिती व प्रमाणपत्र दिल्याप्रकरणी फौजदार के.बी.माकणे यांनी दिलेल्या फिर्यादीवरून गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

# छत्रपती शिवाजी महाराज पुतळा ते नगरनाका रस्त्याच्या दरम्यान यू टर्नच नाही

## ; समोर कार्यालय असुन किलोमीटरचा वळसा ; दुभाजक ओलांडण्याची शर्यत लक्ष्यवेधी आंदोलन :- डॉ.गणेश ढवळे

- - -

बीड:- ( दि.२०) बीड शहरातील बीड ते अहिल्यानगर राष्ट्रीय महामार्गावरील २ किलोमीटरचे काम अंतिम टप्प्यात असुन सध्या दुभाजक उभारणीचे काम सुरू आहे. या रस्त्यावर एक किलोमीटर अंतराच्या पल्ल्यात दोन्ही बाजूंनी जिल्हाधिकारी कार्यालय, जिल्हा व सत्र न्यायालय, सामाजिक न्याय भवन, तहसील,असे २५ हुन अधिक शासकीय कार्यालये आहेत.सदरील मार्ग वर्दळीचा असल्याने ठिकठिकाणी वाहनांना वळण घेण्यासाठी यु टर्न आवश्यक आहे.मात्र छत्रपती शिवाजी महाराज पुतळा ते नगरनाका दरम्यान कार्यकारी अभियंता राष्ट्रीय महामार्ग राजेंद्र भोपळे यांनी तांत्रिक नियमांकडे बोट दाखवून मनमानी कारभार करत शासकीय कार्यालयात येणाऱ्यांना वेठीस धरण्याचा प्रकार सुरू आहे. यु टर्न नसल्याने नागरीकांना समोर कार्यालय असुनही किलोमीटरचा वळसा मारावा लागणार आहे. स्वत:चे दुचाकी किंवा चारचाकी वाहन असणाऱ्यांना हा फेरा असला तरी सामान्य नागरिकांना रिक्षातुन आर्थिक भुर्दंड सहन करावा लागणार आहे. त्यामुळे जिल्हाधिकारी, तहसील, जिल्हा सत्र न्यायालय याठिकाणी पुर्वीप्रमाणेच दुभाजकांमध्ये यु टर्न ठेवावेत या प्रमुख मागणीसाठी सामाजिक कार्यकर्ते तथा मुख्य प्रचार प्रमुख बीड जिल्हा माहिती आधिकार कार्यकर्ता महासंघ महाराष्ट्र राज्य डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांच्या नेतृत्वाखाली आज दि.२१ सोमवार रोजी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर "दुभाजक ओलांडण्याची शर्यत" लक्ष्यवेधी आंदोलन करण्यात आले. निवासी उपजिल्हाधिकारी बीड शिवकुमार स्वामी यांना निवेदन देण्यात आले.यावेळी आंदोलनात शेख युनुस, सुदाम तांदळे, मुबीन




शेख, सुदाम तांदळे,मुस्ताक शेख, बाजीराव ढाकणे , बीड जिल्हाध्यक्ष इंटक रामधन जमाले, बीड जिल्हाध्यक्ष आप अशोक येडे, बीड शहराध्यक्ष आप सादिक इनामदार,आदींनी सहभाग घेतला. नगर रोडवरील कार्यालये दक्षिण बाजू : जिल्हा आरोग्य परीक्षण केंद्र ,शासकीय विश्रामगृह, पंचायत समिती, महिला आर्थिक विकास महामंडळ ,बाल संरक्षण अधिकारी कार्यालय, चंपावती क्रीडा मंडळ उत्तर बाजु :- जिल्हा क्षयरोग कार्यालय, जिल्हा परिषद कन्या शाळा,माध्यमिक शिक्षणाधिकारी कार्यालय ,जिल्हा व सत्र न्यायालय, तालुका न्यायालय, कौटुंबिक न्यायालय, जिल्हा जात पडताळणी कार्यालय, अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळ ,संत रोहिदास चर्मकार महामंडळ, महात्मा फुले विकास महामंडळ, दिव्यांग कल्याण कार्यालय, जिल्हा परिषद समाज कल्याण कार्यालय, सहाय्यक आयुक्त सामाजिक न्याय विभाग, अण्णाभाऊ साठे आर्थिक विकास महामंडळ ,सार्वजनिक बांधकाम कार्यालय, तहसील कार्यालय, उपविभागीय अधिकारी कार्यालय ,जिल्हा पुरवठा विभाग ,जिल्हाधिकारी कार्यालय, जिल्हा मुद्रांक अधिकारी कार्यालय ,नोंदणी निबंध कार्यालय ,जिल्हा परिषद पदाधिकाऱ्यांची निवासस्थाने २ वर्षांपासून काम रखडलेले; कंत्राटदारास १ कोटीचा दंड परंतु सुधारणा नाहीच बीड ते अहिल्या नगर राष्ट्रीय महामार्गावरील बीड शहरातील २ किलोमीटरचे काम २ वर्षांपासून रखडलेल्या अवस्थेत आहे. मार्गावरील खडी,धुरळा उडुन वाहनचालकांना त्रास होत आहे. कंत्राटदाराच्या हलगर्जीपणामुळे नागरीकांना प्रचंड अडचणींचा सामना करावा लागत आहे. अपघाताला निमंत्रण मिळत आहे. सामाजिक संघटना,नागरीकांच्या तक्रारी नंतर जिल्हाधिकाऱ्यांनी या संदर्भाने कठोर भूमिका घेऊन या कामाची पाहणी करून महामार्ग प्राधिकरण आधिका-यांना पत्र देऊन संबंधित कंत्राटदारास १ कोटीचा दंड ठोठावला आहे. सद्यस्थितीत छत्रपती शिवाजी महाराज पुतळा, नगरनाका,बालेपीर याठिकाणी खड्डे खोदून ठेवलेले असुन काम आजही अपुर्ण असुन संथगतीने काम सुरू असुन कंत्राटदाराच्या कामात कोणतीही सुधारणा झालेली नाही.

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
लोकआरंभ
संपादक:राहुल मारोतीराव वाईकर
मंगळवार २२ एप्रिल २०२५
https://lokaarambh.com



## संपादकीय

### मराठी शाळाच दर्जेदार

मार्च, एप्रिल महिन्यांमध्ये परीक्षा संपल्या की, विद्यार्थी निर्धास्त होतात कारण पुढील दीड दोन महिने त्यांच्यासाठी सुट्टीचे असतात. पण याच दोन महिन्यात पालकांना वेध लागतात ते आपल्या पाल्यांच्या पुढील शिक्षणाच्या प्रवेशाचे. दाखलपात्र विद्यार्थ्यांचे पालक म्हणजे ज्यांचे पाल्य पहिलीत दाखल होणार आहेत अशा पालकांमध्ये तर मोठा संभ्रम असतो. आपल्या पाल्यांना मराठी शाळेत दाखल करायचे की इंग्रजी शाळेत दाखल करायचे याबाबत त्या पालकांमध्ये मोठा संभ्रम असतो. मुलांचे शिकण्याचे माध्यम मराठी असावे की इंग्रजी यावर मग कुटुंबात मोठा खल होतो. नातेवाईक, शेजार पाजारी, मित्रमंडळी अशा पालकांना वेगवेगळा सल्ला देत असतात अशा वेळी कोणता निर्णय घ्यावा असा मोठा पेच या पालकांना पडतो. इंग्रजी भाषा ज्ञान भाषा असल्याने इंग्रजी माध्यमात शिक्षण घेण्याकडे बहुतेकांचा कल असतो आणि खरी फसगत इथेच होते. इंग्रजी येण्यासाठी इंग्रजी माध्यमातूनच शिक्षण घ्यावे असे काही नाही मराठी माध्यमातून शिक्षण घेऊनही मुल चांगल्या प्रकारे इंग्रजी शिकू शिकू शकते. आज जे उच्चपदावर बसलेले नामवंत व्यक्ती आहेत ते सर्व मराठी माध्यमातूनच आणि सरकारी शाळेतूनच शिकले आहेत. खरे तर आज जिल्हा परिषद आणि महानगर पालिकेच्या सरकारी शाळेतून दर्जेदार शिक्षण दिले जाते. आज मराठी माध्यमांच्या शाळा देखील कात टाकत आहेत. मराठी माध्यमांच्या सरकारी शाळेत गुणवान, प्रयोगशील, तंत्रस्नेही शिक्षक आहेत. सर्व शिक्षक डी एड, बी एड, एम एड असे उच्च गुणवत्ता प्राप्त आहेत. हे शिक्षक वेगवेगळ्या अध्यापन पद्धतींचा वापर करून विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण देतात. मराठी माध्यमांच्या शाळेत ई लर्निंग, क्टिव्हिटी बेस लार्निंग च्या माध्यमातून शिक्षण दिले जाते. राज्यातील हजारो शाळा आय एस ओ नामांकन प्राप्त झाल्या आहेत. डिजिटल स्कूल, टॅब स्कूल या संकल्पना या शाळेतही रुजत आहेत. जिल्हा परिषद आणि महानगर पालिकेच्या शाळेतही आता सेमी इंग्रजी वर्ग सुरू करण्यात आले आहेत. गुणवत्तेच्या बाबतीतही या मराठी शाळा कोठे कमी नाहीत. ५ वी आणि ८ वी च्या शिष्यवृत्ती परीक्षेच्या गुणवत्ता यादीत सर्वाधिक विद्यार्थी हे जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थीच असतात. नुकताच जवाहर नवोदय परीक्षेचा निकाल घोषित झाला. यात जिल्हा परिषद शाळेतीलच सर्वाधिक विद्यार्थी गुणवत्ता यादीत आले आहेत. याशिवाय मंथन, प्रज्ञाशोध या स्पर्धा परीक्षेतही मराठी शाळांचाच डंका वाजतो. जिल्हा परिषद आणि महानगर पालिकेच्या सरकारी शाळेत मोफत शिक्षण दिले जाते. मोफत पाठ्यपुस्तके, मोफत गणवेश, मोफत शैक्षणिक साहित्य, शालेय पोषण आहार, विविध शिष्यवृत्त्या मिळतात. गुणवत्तेसह सह शालेय उपक्रमातही मराठी शाळा आघाडीवर असतात. मराठी शाळेत पहिलीत दाखल होणाऱ्या विद्यार्थ्यांचा मेळावा, सहल, वनभोजन, क्षेत्रभेट, मातृ-पितृ पूजन, आनंदी बाजार, स्नेहसंमेलन, क्रीडास्पर्धा, ग्र ंथ दिंडी, वृक्ष दिंडी, विविध स्पर्धा सर्व महापुरुषांच्या जयंत्या असे विविध उपक्रम राबवले जातात. आता मराठी माध्यमांच्या सरकारी शाळांकडे पाहण्याचा दृष्टिकोनही बदलला आहे. ग्रामीण भागातील जिल्हा परिषदेच्या शाळेत इंग्रजी माध्यमांच्या शाळेतील विद्यार्थी दाखल होत आहेत. आता तर सर्वच मराठी शाळेत सीबीएएससी चा अभ्यासक्रम शिकवला जाणार आहे म्हणजे जे शिक्षण इंग्रजी माध्यमांच्या खाजगी शाळेत मिळते तेच शिक्षण आता मराठी माध्यमांच्या शाळेतही मिळणार आहे तरीही शहरातील पालकांना अजूनही इंग्रजी शाळेचा मोह सुटत नाही. इंग्रजी माध्यमांच्या शाळांच्या झगमगाटाला भुलून पालक त्या शाळांच्या नादी लागत आहेत. या इंग्रजी माध्यमांच्या शाळांनी शिक्षणाचा बाजार केला आहे . अगदी के जी च्या प्रवेशासाठीही लाखोंची देणगी घेतली जाते शिवाय इमारत निधी, ट्रस्ट निधी तसेच वर्षभर चालणारे वेगवेगळे कार्यक्रम या माध्यमातून पैसे उकळले जातात. पालकांच्या खिशाला कात्री लावण्यासाठी या शाळा वेगवेगळे फंडे शोधत असतात. जर एखाद्या पालकांनी फी भरण्यास उशीर केला तर विद्यार्थ्यांचे शिक्षण बंद करण्यापर्यंत मजल या शाळांची जाते. कोरोना काळात फी भरता न आलेल्या विद्यार्थ्यांना ऑनलाईन शिक्षणापासून वंचित ठेवण्याचे पाप काही इंग्रजी शाळांनी केले आहे. अनेक इंग्रजी शाळा शैक्षणिक साहित्य शाळेतूनच खरेदी करण्याची सक्ती केली जाते. २००३ मध्ये उच्च न्यायलयाने दिलेल्या निकालात शैक्षणिक साहित्य शाळेकडूनच किंवा ठराविक विक्रेत्यांकडूनच खरेदी करण्याची सक्ती करता येणार नाही असे म्हटले आहे. सरकारनेही वेळोवेळी तसे आदेश काढले आहेत पण या शाळांना सरकारी आदेशाचा आणि न्यायालयाच्या निकालाचा विसर पडला आहे. न्यायालये व सरकारला न जुमानता आपली शैक्षणिक दुकानदारी चालवणाऱ्या या शाळांना चाप लावायचा असेल

# घरी बोलावून,दरवाजे घ्यायचे लावून,विचार हवा व्हायला....

आज जिकडे तिकडे स्पर्धा चालू आहे असे जाणवते म्हणजे १०१% ती चालूच आहे. पण,एकमेकांशी स्पर्धा करून काय साध्य करणार आहोत आपण?तोडा,फोडा आणि राज्य करा,अशी सगळीकडे परिस्थिती झालेली आहे.जी अवनिती/कुनिती इंग्रजांनी वापरली राज्य करण्यासाठी तीच अवनिती/कूनिती आपण वापरतो,या जीवन वाटचाली का?आणि कशासाठी? हा ही मोठा यक्ष प्रश्न आहे?हे चित्र लवकरच बदलले पाहिजे.या पुढील चित्र तर फारच भयाण असणार आहे,तेव्हा यावर आताच विचार व्हायला हवा आणि त्यातून उपाय योजना ही.हे साहित्याच्या नावाखाली चालणारे बाजार थांबविले पाहिजे.आपल्या आपल्यात वाद लावून द्यायचे आणि त्यांनी स्वतःचा फायदा करून घ्यायचा.दोन मांजरी आणि एका माकडाची गोष्ट ही आपणा सर्वांना परिचित आहेच.तीच अवस्था आपली आपणच करून घेतली आहे.

आपण स्वतःस साहित्यिक म्हणवितो आणि आपणच एकमेकांना किंमत,मान सन्मान देत नसेल तर काय उपयोग?कोणत्या तोंडाने स्वतःस साहित्यिक म्हणवून घेतो?आपल्या लेखणीचा आणि माणूस या पात्राशी काही संबंध उरतो का?एकीकडे मोठ्या रुबाबात म्हणायचे आम्ही व्यवसाय करत नाही ही एक सेवा आहे.मग,ती खरचं सेवा करतो का? हे प्रत्येकाने आत डोकावून एकदा पाहिले पाहिजे.येथे पैशासाठी मित्र तुटतात.सारीच नाती जर पैशात मोजत बसलो तर,भावनेला किंमत शून्य उरते.आणि जेथे भावनेला किंमत नाही तेथे माणुसकी कशी विरजणार?साऱ्याच गोष्टी पैशात तोलून चालत नसतात. तेथे माणुसकी ही पहावी,ती कृतीतून ओसंडावी लागते.स्वार्थ पाहून जर आपण काम करत असेल तर त्या कार्याचा/ कृतीचा/ सेवेचा उपयोग नाही.बऱ्याच काव्यसंमेलन मध्ये असे घडतांना दिसते की,काव्यसंमेलनासाठी काही ठराविक शुल्क आकारले जाते?ज्यांनी पैसे भरले त्यांना त्या मंचावर २ मिनिट किंवा ३ मिनिट कालावधी दिलेला असतो तरी त्याच्या दुप्पट,चौपट वेळ त्या मंचावर घालवतांना दिसतात.स्वतःचे पुराण ऐकवत,समोरच्यांना पकवत बसायचे. तेव्हा,नियम सर्वांना सारखे का ठेवले जात नाही?मान्य त्यांनी त्यासाठी पैसे खर्च केलेले आहे. पण,ज्यांना सन्मानचिन्ह नको असते,फक्त एक कविता सादर करायची असते,कोणतीही अपेक्षा नसते की आयोजकांनी एखादे फुल/ श्रीफळ/ शाल/ पुस्तक/ सन्मान चिन्ह असे काही द्यावे.फक्त अपेक्षा असते २ ते ३ मिनिटांची एखादी कविता सादर करू द्यावी.पण,ती ही संधी बरेच ९९% आयोजक देतच नाही.खूप विचित्र कार्य ते करत असतात. हे त्यांना समजत नसतं,कारण ते आयोजक असतात ना?पण,आपण काही गोष्टींसाठी विनाकारण नको तेथे,नको तितका वेळ घालविलेला असतो आणि ज्याला काव्यसंमेलन म्हणतो तेथेच फक्त ज्यांनी पैसे दिले त्यांनाच काव्य सादरीकरण करण्याचा,त्यांचा संसार सांगण्याचा नको तितका वेळ दिला जातो?तेथे प्रोटोकॉल का पाळला जात नाही.जेव्हा आयोजक स्वतः बोलवून घेतात या म्हणून तेव्हाही काव्य सादरीकरण करण्याची संधी दिली जात नाही तेव्हा बुध्दीची कीव येते.असे कसे हे लोक वागतात?संयमीवृत्ती तर बिल्कुल दिसत नाही.पैसे भरले म्हणून त्या-त्या व्यक्तींनी २-३ मिनिट ऐवजी १० मिनिटे घेतली तरी त्यांना अडविले जात नाही.समानता कोठे नांदताना तर दिसत नाही,अहो,ती फक्त अन् फक्त संविधानात दिलेली पहायला भेटते.प्रत्यक्ष व्यावहारिक जगात तर ती कोठेही दिसत नाही.येथे भावनेचा ही व्यवहार पहायला भेटतो. पैसा फेको,तमाशा देखो अशी अवस्था झालेली आहे.मी नाही त्यातली/ त्यातला कडी लावा आतली..अशी गोष्ट आहे.

अशा ठिकाणी पैशाचा व्यापार होतांना दिसतो.बरे अशा ठिकाणी विचारी लोक मग जेवण ही करत नाही.कारण जेवण ही काढतात ही हिशोब काढणारी माणसे.असे अनुभव घेतलेले आहे?कोणी बोलविल्याशिवाय कोठे जायचेच नाही?आपणच आपल्याला काही नियम घालून घ्यायचे.हेच उत्तम असते.आपल्या तत्त्वात बसेल तरच ते कार्य करायचे.कारण येथे जग नावेच ठेवायला बसले आहे.म्हणून आपल्या बुध्दीला जे पटेल तेच करावे.

पण,या अशा काही लोकांची अक्षरशः कीव येते.असे लोक पैशासाठीच फक्त प्रत्येक गोष्टीकडे पाहतात का?पण,येथे ती लोक चुकत नाही.तर चुकतो आपणच?आपण का म्हणून त्यांच्या कार्यक्रमाला जायचे?जेथे काव्याला,माणुसकीला किंमत नाही. किंमत फक्त अन् फक्त पैशाला असेल तर.वेगवेगळी आमिषे दाखवायची आणि त्याला आपण फसले जायचे.हे चित्र बदलले पाहिजे.कोठे तरी आपणच या गोष्टींना लगाम घातला पाहिजे.

साटे लोटे ही पहायला भेटते. तू मला मोठे कर?मी तुला मोठे करतो? तू माझे भले कर मी तुझे भले करतो. ते ही दुसऱ्यांच्या जीवावर.त्याला छान असे नाव द्यायचे,मग झाले.मला तू पाहुणा,अध्यक्ष,वक्ता कर मी तुला माझ्या कार्यक्रमात ते पद देतो.मग तर झाले,पण एका कवीला भूक असते त्याच्या एका काव्याची..एक कविता मंचावर म्हणण्याची.ती भूक ही त्याची क्षमविली जात नाही.तर ज्याचे पोट आधीच भरलेले आहे,त्यालाच पुन्हा पुन्हा वाढायचे? ते ही त्याचे पोट फुटूपर्यंत.

विचार बदलण्याची गरज आहे.पाय खेचणारे खेकडे अवतीभवती दिसतात. फक्त हातात हात घालून चालणारे माणसे हवी सोबतीला.जेथे मैत्रीच्या नावाखाली,भावा बहिणीच्या नावाखाली फसवणूक करणारे नको?कधी तरी आपल्याला कोणी तरी प्रत्यक्ष अप्रत्यक्ष मदत केलेली आहे हे तरी विसरू नये.काही जण आपलेच बोट धरून चालतात आणि नंतर चालायला येवू लागले की,आपल्याला तेथेच सोडून पुढे धावत सुटतात.

प्रत्येकाने हवेत उडू नये..उडाले तरी पाय जमिनीवर ठेवावे,असे वाटते. प्रत्येकाने या गोष्टीचा विचार करावा. आपले पूर्वीचे दिवस आठवावे .अन् त्याप्रमाणे वागावे.यशाची खरी व्याख्या समजून घ्यावी.बंगल्यालेक्षा झोपडीतील माणसाला सुखाची झोप येते.पण,जो फक्त पैसा हे ध्येय ठेवतो तो पैशाने कदाचित श्रीमत् होईल..पण माणूस म्हणून लायक नसेल..तेथे तो १०१% नापास म्हणू.माणुसकी या नात्यात शून्य किंवा त्याच्याही खालची त्याची किंमत असते.

आयोजक फक्त पैशासाठी अशा संमेलनाचे आयोजन करीत असतो अशी कितीतरी कार्यक्रम होतात की अगदी कंटाळवाणी होऊन जातात त्यांच्यामध्ये कवितेचा दर्जा असतो ना ऐकणारे कवी दर्जाचे असतात मग अशा कार्यक्रम लक्षात तरी राहतील का येणाऱ्यांच्या ! तरी अशा कार्यक्रमांची रेलचेल आपल्याला पाहण्यास भेटते.अशी कार्यक्रम रोजच कोठे ना कोठे होतच असतात.यातील काहीच कार्यक्रम लक्षात राहतात.

जास्त प्रकाश झोतात येणे ही बरे नाही असेही कधी कधी वाटते? सर्वांना माहीतच आहे,उत्तम डोळ्यांची जिला देणगी लाभली..ती मोनालिसा संपूर्ण विश्वात एका रात्रीत प्रसिद्धीस आली.. पण शेवटी तिची काय अवस्था करून ठेवली.तिची ही शिकार माणसातल्या क्रूर लांडग्यांनी केलीच.तरुण युवक/युवती स्वतःस कमजोर करू लागले आहे? खोट्या अमिषाचचे बळी ठरू लागले आहे.कशाचे ना कशाचे शिकार होतांना दिसू लागले. त्यांच् मानसिक व शारीरिक आरोग्य ही धोक्यात येवू लागले आहे.त्यांच्यातील आत्महत्येचे प्रमाण वाढले आहे.स्वतः चे आयुष्य विनाकारण संपवायला लागले आहे.आपले जीवन इतके स्वस्त आहे का? कोणामुळे ते संपवावे?प्रत्येकालाच एक दिवस या जगाचा निरोप घ्यायचा आहे.एक दिवस जायचेच आहे,पण जितके जीवन आपल्याला मिळालेले आहे ते जीवन आपण भरभरून जगू या..कोणाच्या हातचे कटपुतली होवून जगण्यात काहीच अर्थ नाही.

फुल पाखरासारखे आयुष्य असावे.. फक्त प्रेम द्यावे...अन् घ्यावे..आनंदाची उधळण करावी.जन्मांचे सार्थक करावे. ज्ञानेश्वर महाराजांना अवघे १९ वर्षाचे आयुष्य लाभले म्हणजे त्यांनी संजीवन समाधी घेतली.पण,अल्प जीवनात खूप मौल्यवान देणगी ते आपणास देवून गेले. जीची किंमत होवूच शकत नाही.तेव्हा या चांगल्या गोष्टींचा विचार करू या.मुक गिळून ही जगण्यात अर्थ नाही.गुलामी तर जगूच नये.अन्याय तर बिल्कुल सहन करू नये..अन्यायाला वाचा ही फोडलीच पाहिजे.अन्याय करणाऱ्यांना वाटेल आपण खूप छान कार्य करत आहोत.आणि अशी पापे करायला ते मागे पुढे पाहणार नाही. आपली पिढी आपणच धोक्यात आणु. म्हणून आत्ताच सावधान झालेले बरे. आपले भविष्य आपल्याला घडवायचे आहे.ही मुले भावी नागरिक आहे.सत्ता त्यांच्या हाती जाणार आहे.तेव्हा काय चांगले काय वाईट याचे ज्ञान आपण त्यांना वेळेत द्यायला हवे.कारण एकदा पैशाची चटक लागली तर ती लवकर कमी होत नाही.माणूस अजून वाहत जातो.पैसा खूप काही देतो म्हणण्यापेक्षा खूप काही घेवून जातो.प्रत्येक गोष्टीला मर्यादा या हव्यातच.

ज्यांचा आवाज चांगला,म्हणजे ज्यांच्या ग्येय कविता असेल तरच तो/ ती उत्तम कवी/ कवयित्री...जे मनापासून कविता म्हणतात ते कवी नाही का?त्यांना भावना,मन नाही का? त्यांना जाणीव नाही का? प्रत्येक जण लताताई/आशाताई नाही ना होवू शकणार? याचे ही भान राहत नाही.खूप काही बोलण्यासारखे आहे.... खूप काही विचार करण्यासारखे आहे... खूप काही बदल होणे अपेक्षित आहे... तो बदल कमीत कमी प्रत्येकाने आपल्या स्वतःत करून घेणे अधिक महत्त्वाचे आहे. कारण आपण राजकारणी नाही .फक्त निवडणुकी पुरते आश्वासने द्यायची आणि एकदा निवडून आले की?तू कोण?अन् मी कोण?मी नाही ओळखत?साधी ओळख ही द्यायची नाही.असे राजकारण तरी खेळू नका.एकनिष्ठ,प्रामाणिक रहा..दिलेल्या वचनाला जागायला शिका.महत्त्वाचे माणूस म्हणून जगायला शिका.स्वतः जगा इतरांना जगवा,हसा अन् हसवा.. हे जीवन पुन्हा नाही.आहे त्या जीवनाचा सदुपयोग करायला शिका.माणूस म्हणून जन्म घातला तर माणूस म्हणून जगायला शिका.

नको आयुष्य हे शंभर वर्षाचे ?
हवे फुलपाखरासारखे बेधुंद
आनंदी जीवन हे चार दिसाचे
देण्यास हो एकमेंका परमानंद....

**सौ.प्रतिमा अरुण काळे/ खेमनर**
**निगडी प्राधिकरण,पुणे ४४**
**मोबाईल नंबर:- ८८३०६५४६६१**

# सरपंच ॲड. गणेश मोरे यांना महाराष्ट्र भूषण सन्मान पुरस्कार जाहीर..

## बीड जिल्ह्यात जनतेतील कमी वयात सरपंच झालेला म्हणून ओळख..

## विविध विकास कामे केलेली दखल घेत युवा महाराष्ट्र फाउंडेशन ने केला पुरस्कार जाहीर..

बीड प्रतिनिधी - बीड तालुक्यातील वडगाव कळसंबर येथील सरपंच मा. ॲड. गणेश आसाराम मोरे यांनी गावातील विविध विकास कामे केले आहेत. आदर्श सरपंच म्हणून त्यांची परिसरात ओळख निर्माण झाली आहे. गोरगरिबांच्या मदतीला धावून जाणारा हा गणेश सतत लोकांच्या सेवेत असतो.

ॲड . गणेश मोरे यांना महाविद्यालयीन जीवनापासून सामाजिक कार्य करण्याची आवड असून ते नेहमीच समाजकार्यासाठी अग्रस्थानी असतात. गावचे प्रथम नागरिक म्हणून ते उत्तमपणे आपले कार्य करत असल्याने ग्रामस्थ त्यांच्या कार्यपद्धतीवर समाधानी आहेत. ते करत असलेल्या कामाची दखल घेत युवा महाराष्ट्र फाउंडेशन यांनी महाराष्ट्र भूषण सन्मान पुरस्कारसाठी निवड केली आहे. त्यांच्या कार्याची दखल घेत त्यांना युवा महाराष्ट्र फाउंडेशन यांनी महाराष्ट्र भूषण 2025 चा सन्मान पुरस्कार जाहीर केलेला आहे. यामध्ये अनेक दिगजांचा सन्मान सोहळा पार पडणार आहे. पुरस्कार वितरण 23 एप्रिल 2025



रोजी दुपारी बारा वाजता पार पडणार आहे. पुरस्कार वितरणासाठी पूजा राठोड अभिनेत्री, इलक्षी गुप्ता अभिनेत्री तानाजी चित्रपट, हसीनी सुधीर अभिनेत्री साउथ चित्रपट, रुचिरा जाधव अभिनेत्री लागीर प्रेमाचं, या पुरस्कार सोहळ्यासाठी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहे. ॲड . गणेश मोरे यांची सरपंच पदाची दुसरी टर्म असून जनतेतील सरपंच पदाच्या पहिल्या निवडणुकीमध्ये गणेश मोरे बीड जिल्ह्यातील कमी वयात पहिल्या वेळेस जनतेतून सरपंच झालेला मुलगा म्हणून ओळख निर्माण झालेली आहे. आता सध्या त्यांच्या मातोश्री सुशाला आसाराम मोरे या सरपंच आहेत. गणेश मोरे यांची ओळख मेटे साहेबांचा कार्यकर्ता म्हणून निर्माण झालेली आहे. पुरस्कार जाहीर झाल्यामुळे गणेश मोरे यांचे अभिनंदन आणि कौतुक परिसरातून नव्हे तर बीड जिल्ह्यामधून होत आहे, त्यांच्यावर शुभेच्छांचा वर्षाव होताना पाहायला मिळत आहे. स्वच्छतेच्या उद्देशाने नाली बांधकाम, गटारी योजना, प्रवाहाप्रमाणे नळ पाणीपुरवठा योजना राबवली, गावच्या स्वच्छतेच्या अनुषंगाने गावातील प्रत्येक घरासमोर शोषखड्डे नियोजन करण्यात आले आहे. गावामधील पाणी असेल ते त्याच ठिकाणी मुरून पाणी पातळी वाढण्यासाठी मदत होते यासाठी त्यांनी अनेक विविध विकास कामे तसेच योजना सुद्धा राबवल्या आहेत. आदर्श ग्रामपंचायत त्यांनी निर्माण केलेली आहे. हा गौरव बीड जिल्ह्यासाठी अत्यंत अभिमानास्पद असून, इतर अधिकारी व कर्मचाऱ्यांसाठी, सरपंचासाठी प्रेरणादायी ठरणारा आहे.

# आरोग्य सेवा हे देशसेवेच रुप, त्याची इंडस्ट्री होऊ देऊ नका-शेटे

माजलगाव-( प्रतिनिधी) आरोग्याचं क्षेत्र हे देशसेवेच माध्यम आहे, त्याची इंडस्ट्री होऊ देऊ नका असे प्रतिपादन आयुष्मान भारत महाराष्ट्र समितीचे अध्यक्ष डॉ. ओमप्रकाश शेटे यांनी केले. गुरुकृपा शिक्षण समुहाच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती महोत्सवात मसन्मान भूमिपुत्रांचाफ कार्यक्रमात त्यांचा सन्मान करण्यात आला त्यावेळी ते बोलत होते. यावेळी डॉ. शिवरत्न शेटे, शिल्पा शेटे यांचाही सन्मान करण्यात आला. प्रकाश राजेभोसले, नंदिनी राजेभोसले, डॉ. प्रकाश आनंदगावकर, संजय मालाणी, शिवाजी रांजवण, जयदत्त नरवडे, संतोष यादव, अरुण इंगळे, अशोक तिडके, भास्कर शिंदे, प्रफुल्ल पाटील, उमेश मोगरेकर, डॉ. यशवंत राजेभोसले आदींची यावेळी उपस्थिती होती. यावेळी सन्मानाला उत्तर देताना ओमप्रकाश शेटे यांनी आयुष्यात पैशापेक्षा नैतिकतेला महत्व देत आलो म्हणून समाजासाठी काही करता आले. सामान्य रुग्णाप्रती असलेल्या तळमळीतून काम करत गेलो, कुटुंबाचे संस्कार आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दाखविलेला विश्वास यातून हे करता आले. आरोग्य सेवा म्हणजे देशसेवा आहे हे लक्षात ठेवले पाहिजे असे सांगतानाच लवकरच या पेक्षाही मोठी जबाबदारी घेऊन म मी पुन्हा येईलफ असे सांगितले. आयुष्मान भारत मधील उपचारांचे पॅकेज लवकरच बदलण्यात येतील असा शब्दही त्यांनी दिला. डॉ. शिवरत्न शेटे यांनी शिवराय आणि बाबासाहेब यांच्यातील साम्यस्थळे सांगितली. यावेळी डॉ. प्रकाश आनंदगावकर, संजय मालाणी, डॉ. प्रफुल्ल पाटील, उमेश मोगरेकर यांची समयोचित भाषणे झाली. प्रास्ताविकात डॉ. यशवंत राजेभोसले यांनी आयोजनामागची भूमिका मांडत नव्या जबाबदारी नंतर ओमप्रकाश शेटे यांचा मराठवाड्यातील पहिला सत्कार माजलगावात होत असल्याचा आनंद असल्याचे सांगितले. सुत्रसंचलन अशोक वांडेकर यांनी केले तर आभार मनोज फरके यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी पांडुरंग उगले,कपिल डोंगरे, डॉ. रंगनाथ



गोळकर, डॉ. युवराज कोल्हे, विकास लांडगे, अमित बिंदू आदींनी परिश्रम घेतल

# नागपूर हिंसाचारातील आरोपी हमीदला जामीन मंजूर

नागपूर शहराच्या महाल परिसरात मार्च १७ रोजी दोन गटात झालेल्या दगडफेकीनंतर दंगल उसळली होती. हिंसाचार प्रकरणातील आरोपी हमीद इंजिनिअरला नागपूर सत्र न्यायालयाने जामीनावर सोडण्याचे आदेश दिले आहेत. ५० हजार रुपयांच्या जात मुचलक्यावर जामीनावर मुक्त करण्याचे हे आदेश देण्यात आले असून उद्या (२२ एप्रिल) कारागृहातून सुटका होण्याची शक्यता आहे. नागपूर हिंसाचार प्रकरणात सोशल मीडियावर दंगल भडकवणारे व्हिडिओ टाकण्यामागे हमीद इंजिनिअरचा कट असल्याच्या आरोपाखाली पोलीसांनी हमीद इंजिनिअरला अटक करण्यात आली होती. हमीद इंजिनिअर मायनॉरीटी डेमोक्रॅटीक पक्षाचा कार्याध्यक्ष आहे. नागपूरातील दंगल प्रकरणात कट रचल्याचा त्याच्यावर आरोप आहे. औरंगजेब समर्थक म्हणून त्याची ओळख आहे. सोशल मिडिया मीडियावर भडकवणारे व्हिडिओ टाकल्याचा आरोप त्याच्यावर आहे. ज्या भागात हिंसाचार घडला त्याच परिसरात हमीद इंजिनिअर राहतो. सोशल मीडियावर भडकवणारे व्हिडिओ टाकल्यामुळे त्याला अटक करण्यात आली होती. हमीद इंजिनिअरने फहीम खानच्या अटकेवर प्रश्न उपस्थित केले होते. ज्या दिवशी हिंसाचार झाला त्या दिवशी हमीद लोकांमध्ये भीती निर्माण करणारी वक्तव्य करत

# गेवराईत कुटुंबातील ८ जणांवर कोयता व रॉडने वार, एकाचे डोके फोडले

गेवराई। प्रतिनिधी माजलगाव शहरात खुनाची दोन प्रकरणं ताजी असताना आता गेवराई तालुक्यातील वाहेगाव येथे आठ जणांवर कोयता आणि रॉडने हल्ला झाला आहे. याप्रकरणी मात्र अद्याप पोलिसात तक्रार दाखल झालेली नाही. ही घटना १६ एप्रिल रोजी घडली असून या जखमींवर सध्या जिल्हा रुग्णालयात उपचार सुरू आहेत. घराच्या गेटला वारंवार टँकर का धडकवतो? अशी विचारणा केल्याचा राग मनात धरून गेवराई तालुक्यातील वाहेगावात राहणाऱ्या पठाण कुटुंबावर हल्ला केला. या हल्ल्यात पाच जण गंभीर जखमी असून इतर तिघेजण किरकोळ जखमी आहेत. यातील एका व्यक्तीच्या डोक्यात ४८ टाके पडले असून डोकं पूर्णपणे रक्तानं माखल आहे. तर इतर गंभीर जखमींवर उपचार सुरू आहेत. दरम्यान माजलगावात ढाबा मालक आणि त्याच्या मुलावर प्राण घातक हल्ला केल्याचा धक्कादायक प्रकार रात्री उघडकीस आला होता. यात गंभीर जखमी असलेल्या



बाप लेकावर उपचार सुरू होते. यात महादेव गायकवाड यांचा मृत्यू झाल्याने खळबळ उडाली आहे. ही घटना ताजी असतानाच गेवराईत घडलेल्या या घटनेमुळे मोठी खळबळ उडाली आहे. बीडमध्ये गेल्या अनेक महिन्यांपासून गुन्हेगारीने कळस गाठल्याचे चित्र कायम आहे. घराच्या गेटला वारंवार टँकर का धडकवतो? असा जाब विचारल्याचा राग मनात धरून गेवराई तालुक्यात वाहेगावात राहणाऱ्या पठाण कुटुंबातील आठ जणांवर कोयता आणि रॉडने हल्ला करत त्यांना जखमी केल्याची घटना घडली आहे. या गंभीर घटनेत पठाण कुटुंबातील पाच जण गंभीर जखमी झाले असून एकाच्या डोक्यात ४८ टाके पडले आहेत. किरकोळ कारणांवरून वाद झाल्याने ही मारहाण करण्यात आल्याचे समोर आले आहे. या घटनेनंतर परिसरात मोठी खळबळ उडाली आहे. यात कोयता हल्ल्यात जखमी झालेल्या पाच ते

# कडक उन्हामुळे कलिंगडाला मागणी

पिंपळनेर-प्रतिनिधी दिवसेंदिवस उन्हाच्या झळा वाढत असल्याने कलिंगडाला मागणी वाढली आहे. कलिंगडाचे भाव आटोक्यात असल्याने मोठ्या प्रमाणात विक्री होत आहे. बीड तालुक्यातील पिंपळनेर सह परिसरात अनेक शेतकरी उन्हाळी हंगामात कलिंगडाचे उत्पादन घेतात. सध्या कलिंगडास गुणवत्तेनुसार व आकारानुसार १० ते १२ रुपये किलो भाव मिळत आहे. अनेक व्यापारी शेतातच कलिंगड खरेदी करत आहेत. गावागावात, मुख्य रस्त्यांच्या बाजूला अनेक छोटे , मोठे व्यापाऱ्यांनी कलिंगडाच्या विक्रीचे स्टॉल लावले आहेत. ३०, ४०, ५०, ६० रुपयांना कलिंगडाची विक्री होत आहे. उन्हाचा तडाखा वाढल्याने जवळा ,पिंपळनेर नाथापूर, ताडसोन्ना, घाटसावळी येथिल बाजारात कलिंगडास मागणी वाढली आहे. सी कलिंगडमध्ये व्हिट ॅमिन सी- सी-मुबलक प्रमाणात आढळते. यामुळे रोगप्रतिकारशक्ती वाढते. कलिंगडामध्ये कॅलरी आणि फॅट कमी असते. कलिंगड हा आहारातील फायबरचा चांगला स्रोत आहे, असे डॉ.शिंदे यांनी सांगितले.



किल्ले पर्यटन महोत्सव सेवा संस्था,महाराष्ट्र, जिद्द फाउंडेशन कोल्हापूर येथे आयोजित लक्षवेध सामाजिक संमेलनात श्री विठ्ठलगड शिक्षण प्रसारक मंडळ सारणी संचालित गुरुनानक प्राथमिक विद्यालय,बीड चे आदर्श शिक्षक श्री राजेश अर्जुनराव गदळे यांना महाराष्ट्र रत्न गुणगौरव पुरस्कार देऊन गौरविण्यात आले आहे.त्यांच्या या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष,मुख्याध्यापक,सर्व स्टाफ व मित्रपरिवारतर्फे त्यांचे अभिनंदन केले जात आह

# शासकीय आयटीआय कॉलेज परिसरात पथदिवे बंद, नागरिकांचे रात्रीच्या सुमारास बेहाल

## पथदिवे तात्काळ बसवण्यात यावे प्रा. जिल्हाध्यक्ष अण्णासाहेब मतकर यांची मागणी



बीड प्रतिनिधी अंकुश गवळी बीड शहरातील शासकीय तंत्रज्ञिकेतन स्वर्गीय विनायकराव मेटे शासकीय महाविद्यालय बीड, या ठिकाणी रात्रीच्या सुमारास बीड शहरातील नागरिक व्यायाम व रनिंग साठी येत असतात रात्रीच्या सुमारास त्या ठिकाणी खूप मोठ्या प्रमाणात त्या ग्राउंडवर अंधार आहे, या ठिकाणी तेथील पथदिवे बंद आहेत, या ठिकाणी महिला पुरुष व वृद्ध नागरिक विद्यार्थी रनिंग करिता येत असतात रात्रीच्या पाच ते आठच्या सुमारास असतात त्या ठिकाणी खूप मोठ्या प्रमाणात अंधार आहे , याकरिता या ग्राउंड वरचे लवकरात लवकर पथदिवे चालू करण्यात यावे अशी मागणी बीड जिल्ह्याचे सामाजिक कार्यकर्ते तथा राष्ट्रीय समाज पक्षाचे जिल्हाध्यक्ष अण्णासाहेब मतकर यांनी केली आहे,

# जन सुरक्षा विधेयक विरोधात माकपचे उद्या निदर्शने !

बीड-प्रतिनिधी सन २०२४ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३३, ज्याअंतर्गत व्यक्ती व संघटना यांच्या विवक्षित बेकायदेशीर कृत्यांना प्रतिबंध घालण्याच्या नावाखाली हे विधेयक अभिव्यक्ती स्वातंत्र्यावर मर्यादा आणणारे आणि आधारे दडपशाही करण्यासाठी केला जाऊ शकतो. अभिव्यक्ती स्वातंत्र्य हे कोणत्याही लोकशाही देशाचे महत्त्वाचे वैशिष्ट्य असून, त्यावर कोणत्याही प्रकारची बंधने लादणे हा लोकशाही मूल्यांचा ऱ्हास भारतीय संविधानातील अनुच्छेद १९ मध्ये दिलेल्या मूलभूत हक्कांचे उल्लंघन करणारे आहे.हे विधेयक अत्यंत व्यापक आणि अस्पष्ट व्याख्या वापरून व्यक्ती व संघटनांवर आणि नागरिकांच्या हक्कांचा अवमान आहे. या विधेयकामुळे महाराष्ट्रातील नागरी हक्क, लोकशाही मूल्ये आणि अभिव्यक्ती स्वातंत्र्यावर गंभीर परिणाम होईल. म्हणजेच सरकारच्या चुकीच्या निर्णयाविरुद्ध अथवा एखाद्या सरकारी कठोर निर्बंध लावण्याचा प्रयत्न करणारे असून, त्याचा गैरवापर राजकीय, सामाजिक आणि विचारसरणीच्या अधिकाऱ्याने केलेल्या अन्यायाच्या विरोधात आंदोलनाच्या मार्गाने दात मागणे हे देखील बेकायदेशीर कडक उन्हामुळे ठरल्यामुळे जनतेचा सरकार विरोधी आवाज पूर्णपणे दडपून टाकला जाणार आहे तेव्हा लोकशाही व्यवस्था जिवंत ठेवण्यासाठी डाव्या आघाडीच्या वतीने मंगळवारी दिनांक २२ एप्रिल २०२५ रोजी जिल्हाधिकारी कार्यालय समोर निदर्शने आंदोलन करण्यात येणार असून या आंदोलनास नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन बीड जिल्हा सामाजिक कार्यकर्ता संघटनेचे अध्यक्ष तथा सेवानिवृत्त ईपीएस ९५ समन्वय समितीचे जिल्हाध्यक्ष डॉ.संजय तांदळे व मराठवाडा शिक्षक संघटनेचे निमंत्रक प्राचार्य डी जी तांदळे , बीड शहर बचाव मंचचे अध्यक्ष नितीन जायभाये यांनी केले आहे.

# प्रा.धम्मानंद बोराडे यांचा एमपीएससी उत्तीर्ण झाल्याने यशोधरा बुद्धविहाराच्या वतीने सत्कार

माजलगाव-प्रतिनिधी सावरगाव येथील सुपुत्र आणि फुले, शाहू, आंबेडकरी विषयाचे अभ्यासक प्रा. धम्मानंद बोराडे यांची महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत औद्योगिक न्यायालयात कार्यकारी सहाय्यक (क्लार्क) पदावर निवड झाली. त्यांचा गौरव यशोधरा बुद्धविहार ट्रस्टच्या वतीने सत्कार करण्यात आला. शिक्षण क्षेत्रात योगदान देणारे बोराडे नेट-सेट व एम.फील असूनही अनेक वर्षे सु ंदरराव सोळंके महाविद्यालय व सिद्धेश्वर महाविद्यालय येथे तासिका तत्वावर कार्यरत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी लिंबाजी वाघमारे होते, तर प्रमुख पाहुणे म्हणून प्रभाकर साळवे, प्रा. सुदर्शन स्वामी, अशोक कांबळे, शिवाजी ससाणे, पत्रकार रविकांत उघडे, सुभाष बोराडे, सिद्धार्थ पौळ, विशाल जावळे ,आदित्य जाधव आदी उपस्थित होते. प्रास्ताविक यशोधरा बुद्धविहाराचे सचिव बाबासाहेब जाधव यांनी केले. प्रभाकर साळवे, प्रा.सुदर्शन स्वामी, राजकुमार सोनवणे सर यांनी मनोगत व्यक्त करताना बोराडे सरांचे यश हे जिद्द, संघर्ष व निष्ठे चे प्रतीक असल्याचे नमूद केले. प्रा. बोराडे यांनी सत्काराला उत्तर देताना आपल्या संघर्षमय प्रवासाची मांडणी केली, ते म्हणाले की बुद्ध, फुले, शाहू, आंबेडकर यांच्या विचारांचा प्रभाव माझ्यावर असल्याने आणि वाचनाची गोडी असल्यामुळेच हे यश शक्य झाले तसेच या प्रवासात प्राथमिक ते पदव्युत्तर मार्गदर्शन करणाऱ्या गुरुजनांचे, कुटुंबाचे, मित्रपरिवाराचे मी विशेष आभार मानतो असे त्यांनी नमूद केले.

# आईचे हळवे मन पुस्तक प्रकाशन सोहळा

'वसुधा फाऊंडेशन' आयोजित माय मराठी राज्यस्तरीय कवी संमेलन व 'वसुधा फाऊंडेशन' संस्थापिका मा.सौ.वसुधा नाईक यांच्या "आईचे हळवे मन" या लघु कथा संग्रहाचे पुस्तक दि. 18/04/2025 रोजी स्वातंत्र्यवीर सावरकर अध्यासन केंद्र, डेक्कन कॉर्नर, पुणे येथे प्रकाशन झाले. ज्येष्ठ साहित्यिक मा.वि.ग.सातपुते , ज्येष्ठ साहित्यिक डॉ.मधुसूदन घाणेकर, आधुनिक बहिणाबाई मा.विमलताई माळी, मा.जयप्रकाश झेंडे तसेच युवा गझलकार मा.गिरीश जंगमे, राजयुवा प्रकाशनाचे प्रकाशक मा.गौरव पुंडे तसेच वसुधा नाईक यांच्या परिवाराच्या हस्ते पुस्तक प्रकाशन सोहळा पार पडला.तसेच या



कार्यक्रमाची सुरुवात गणेश वंदनाने झाली.सौ. वसुधा नाईक यांच्या कन्या कोमल,शीतल तसेच नात सोनाक्षी यांनी गणेश वंदना उत्तम सादर केली. या वेळी महाराष्ट्रातील विविध ठिकाणाहून आलेल्या 52 कवींनी आपल्या कविता सादर केल्या तसेच रसिक मनाची मने जिंकली. तसेच आलेल्या सर्व कवींचे अक्षरधन,सन्मानचिन्ह व सन्मानपत्र देऊन गौरविण्यात आले.तसेच या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मा.मधुकर्णिका सारिका सासवडे यांनी बहारदार केले.दीपाराणी गोसावी हिने मस्त रांगोळी काढून सजावट केली.मृण्मयी काळे या 12 वर्षीय बालिकेने स्त्री भ्रूण हत्या या वर एकपात्री उत्कृष्ट नाटक सादर करून रसिकांची मने जिंकली. या सर्व कार्यक्रमाचे आयोजन गौरव पुंडे, योगेश हरणे,श्रीराम घडे,पल्लवी पवार,मयुरी लायगुडे,तुषार पालखे यांनी उत्तम असे केले.सर्व टीमने कार्यक्रम अतिशय उत्तम केला. नातलग, मित्र परिवार मोठ्या संख्येने कार्यक्रमास उपस्थित होता.

वसुधा वैभव नाईक, पुणे

# रोहिणी प्रकाशन व्दारा, जीवन माझे, विचारधारा, कवी दर्पण, काव्यसंग्रहाचे ऑनलाईन प्रकाशन .

वाचन छंद प्रेमी साहित्य समूह प्रस्तुत आणि रोहिणी पब्लिकेशन मुंबई जीवन माझे, विचारधारा कवितासंग्रह,तसेच कवी दर्पण या काव्यसंग्रहाचे उपस्थित मान्यवरांच्या हस्ते ऑन लाईन प्रकाशन करण्यात आले .

महाराष्ट्रातील अनेक साहित्यिक कवी लेखक उपस्थित होते . रोहिणी पब्लिकेशन मुंबई यांचे व्यवस्थापक रोहिणी वाघमारे यांच्या शुभहस्ते तीनही काव्यसंग्रहाचे ऑनलाइन पद्धतीने प्रकाशन करण्यात आले . सदर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ज्येष्ठ साहित्यिक कवी लेखक श्री मनोहर पवार केळवदकर यांनी केले . जीवन माझे या या काव्यसंग्रहाचे संपादक कवी बबन आराख, विचारधारा काव्यसंग्रहाचे संपादक कृष्णा भालेराव आणि या कवी दर्पण या काव्यसंग्रहाचे संपादक सौ .लतीफा बिहाडे आदी उपस्थित होते . या ऑनलाईन प्रकाशन सोहळ्यात महाराष्ट्र राज्यातील अनेक जिल्हयातून वेगवेगळ्या कवी, लेखकांनी सहभाग घेतला . सर्व प्रथम कार्यक्रमाचे सुत्रसंचालन मनोहर पवार यांनी केले . तसेच रोहीनी पब्लिकेशनच्या वतीने रोहीनी वाघमारे यांनी प्रस्तावना सादर केली . त्यानंतर सर्व उपस्थित संपादक कवी, लेखक, यांच्या साक्षीने रोहीनी वाघमारे यांनी सदर तिनही सुंदर व सुबक काव्य अंकाचे ऑनलाईन पद्धतीने प्रकाशन करण्यात आले . यावेळी सर्व सहभागी कवी, लेखक यांनी या सुंदर सोहळ्यात सहभाग घेवून आनंद व्दिगुणीत केला . प्रकाशन सोहळ्या नंतर लगेच उपस्थितीत सहभागी कविंचा बहारदार




काव्य सादरीकरणाचा कार्यक्रम झाला, त्यामध्ये सुरुवातीला कवी मनोहर पवार यांनी सुंदर आवाजात आपली रचना सादर करून सुरुवात केली . त्यानंतर लतिफा बिहाडे यांनी सुंदर आ श या ा च ी क ा व्य रचना सादर केली . बबन आराख, ज्योती कडू, सौ, आरती लाड, दिपक सरदार, जितेंद्र आमटे, डॉ. अशोक सिरसाठ, डॉ . चंद्रशेखर मुळे, शितल घाणेकर, प्रकाश पांडे, सौ. रेखा देशमूख, चंद्रकात बोर्डे, अशोक मिठबांवकर, सुहास टिपरे, डॉ. श्रद्धा वाशिमकर, निला ताम्हणकर, सुस्मिता रेंदाळकर, मनिषा वराळे, वैशाली शिंदे, ज्योती बनसोड, आदी कवि, कवियत्री यांच्या रचना सादर झाल्यात . आणि त्यांच्या सुंदर अशा रचनाही तिन्ही काव्यसंग्रहात समाविष्ट आहेत . वाचन छंद प्रेमी साहित्य समुह, आणि रोहीनी पब्लीकेशन च्या वतीने रोहीनी वाघमारे मॅडम यांनी सदर प्रकाशन व काव्य सादरीकरण कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता . या पूर्वीही रोहीनी प्रकाशनाचे विविध पुस्तकांचे प्रकाशन या पूर्वीच झाले आहेत . दर्जेदार साहित्य काव्य पुस्तक निर्मिती मांडणी व प्रकाशन असलेले रोहीनी पब्लीकेशन सुप्रसिद्ध आहेच . सदर ऑन लाईन कार्यक्रमाचे, प्रकाशन सोहळ्याचे व कवी संमेलनाचे सुंदर ' सुत्रसंचालन व आभार कवी मनोहर पवार यांनी मानले .

# डॉ.उज्जैनकर व श्री बाळूभाऊ ईटणारे यांचा समृद्धी महिला पतपेढी, शेगाव येथे झाला सत्कार



शिवचरण उज्जैनकर फाउंडेशन मुक्ताईनगर जिल्हा जळगावचे संस्थापक अध्यक्ष डॉ. शिवचरण उज्जैनकर यांनी नुकतेच श्री समृद्धी महिला नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित, शेगाव जिल्हा बुलढाणा येथे सदिच्छा भेट दिली याप्रसंगी त्यांचा गुलाब बुके देऊन पतपेढीचे व्यवस्थापक श्री सुरेंद्र धनोकार साहेब यांनी डॉ. उज्जैनकर व उज्जैनकर फाउंडेशनचे बुलढाणा जिल्हा समन्वयक तथा उज्जैनकर सर यांचे व्याही श्री बाळूभाऊ इटनारे यांचा गुलाब बुके देऊन सत्कार केला याप्रसंगी पतपेढीचे कर्मचारी श्री कैलासभाऊ दाभाडे उपस्थित होते. उज्जैनकर फाउंडेशनच्या आयोजित तिसरे राज्यस्तरीय शिव बाल, किशोर व युवा मराठी साहित्य संमेलन आळंदी देवाची जिल्हा पुणे येथे 4 जानेवारी 2025 रोजी भव्य आणि ऐतिहासिक संमेलन संपन्न झाले या प्रसंगी या पतपेढीचे या संमेलनाला 25 ट्रॉफीचे सौजन्य मिळाले होते त्यामुळे या प्रसंगी डॉ. उज्जैनकर व श्री बाळू इटणारे यांनी पतपेढीचे व्यवस्थापक श्री सुरेंद्र धनोकार साहेब यांना आदिशक्ती संत मुक्ताईचा फोटो,प्रमाणपत्र व स्मृतिचिन्ह देऊन त्यांचा सुद्धा गौरव केला. या पतपेढीच्या संचालिका तथा उज्जैनकर फाउंडेशनच्या बुलढाणा जिल्हा उपाध्यक्षा मा. पूजाताई खेते यांचे सहकार्य लाभले होते.

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
लोकआरंभ
संपादक:राहुल मारोतीराव वाईकर
मंगळवार २२ एप्रिल २०२५
https://lokaarambh.com



# मोठी बातमी! भरदिवसा बिल्डरच्या घरावर गोळीबार; अबरनाथ हादरलं

अंबरनाथमधून एक धक्कादायक बातमी समोर आली आहे. बांधकाम व्यावसायिकाच्या घरावर गोळीबार करण्यात आला आहे, या घटनेनं खळबळ उडाली आहे. उद्योजक विश्वनाथ पनवेलकर यांच्या घरावर गोळीबार करण्यात आला आहे. हल्लेखोर दुचाकीवरून आले होते. त्यांनी पनवेलकर यांच्या घरावर दोन गोळ्या झाडल्या, त्यानंतर हल्लेखोर घटनास्थळावरून फरार झाले.

घटनेबाबत अधिक माहिती अशी की, अंबरनाथमध्ये बांधकाम व्यावसायिक विश्वनाथ पनवेलकर यांच्या घरावर गोळीबार झाल्याची घटना घडली आहे. आज दुपारी अडीच वाजताच्या सुमारास दुचाकीवरून आलेल्या दोन अज्ञात हल्लेखोरांनी पनवेलकर यांच्या घरावर दोन गोळ्या झाडून पळ काढला. अंबरनाथच्या हुतात्मा चौकाजवळ उद्योजक विश्वनाथ पनवेलकर यांचं सीताई सदन हे घर आहे. आज दुपारी अडीच वाजताच्या




सुमारास पनवेलकर यांच्या घराबाहेर दुचाकीवरून दोन अज्ञात हल्लेखोर आले आणि त्यांनी पनवेलकर यांच्या घराच्या गेटच्या दिशेने दोन गोळ्या झाडत तिथून पळ काढला. ही संपूर्ण घटना पनवेलकर यांच्या घराबाहेर असलेल्या सीसीटीव्ही कॅमेरात कैद झाली.

तपासाला सुरुवात

अंबरनाथमध्ये ही घटना घडली आहे, बांधकाम व्यावसायिकाच्या घरावर गोळीबार करण्यात आला. विश्वनाथ पनवेलकर यांच्या घरावर दुचाकीवरून आलेल्या अज्ञात हल्लेखोरांनी गोळीबार केल्या दोन गोळ्या झाडल्या, त्यानंतर त्यांनी घटनास्थळावरून पळ काढला, या घटनेनं खळबळ उडाली आहे. दरम्यान घटनेची माहिती मिळताच पोलीस घटनास्थळी दाखल झाले. शिवाजीनगर पोलीस तसेच क्राईम ब्रँचच्या टीमनं घटनास्थळी धाव घेऊन तपासाला सुरुवात केली आहे, घटनेबाबत अधिक तपास सुरू असल्याची माहिती पोलिसांनी कडून देण्यात आली आहे.

दरम्यान या घटनेमुळे परिसरात दहशतीचं वातावरण आहे, हे हल्लेखोर नेमके कोण होते? गोळीबार करण्यामागचा त्यांचा नेमका उद्देश काय होता? हे अजून समोर आलेलं नाही, पोलिसांकडून या घटनेसंदर्भात तपास सुरू आहे. यापूर्वी देखील चेंबूरमध्ये अशीच एक घटना घडली होती, एका बिल्डरच्या वाहनावर गोळीबार करण्यात आला होता. सदरुद्दीन खान असं या बांधकाम व्यावसायिकाचं नाव होतं. या घटनेत ते जखमी झाले होते.

# गाढे पिंपळगाव येथे अखंड हरिनाम सप्ताह व ज्ञानेश्वरी पारायण सोहळा

परळी वैजनाथ : तालुक्यातील गाढे पिंपळगाव येथे गेल्या १५२ वर्षांची परंपरा असलेला ग्रामदैवत श्री.पापदंडेश्वर पालखी सोहळ्यानिमित्त शनिवारी (ता.१९) पासून शुक्रवार (ता.२५) पर्यंत अखंड हरिनाम सप्ताह व ज्ञानेश्वरी पारायण सोहळा व शिव कथेचे आयोजन करण्यात आले असून पंचक्रोशीतील भाविक भक्तांनी या सोहळ्यास सहभागी होण्याचे आवाहन गावकऱ्यांच्या वतीने करण्यात आले आहे. दिडशे वर्षांची परंपरा असलेला श्री.पापदंडेश्वर पालखी सोहळ्या निमित्त शनिवार पासून अखंड हरिनाम सप्ताह व ज्ञानेश्वरी पारायण सोहळा व शिव कथेचा प्रारंभ झाला. या हरिनाम सप्ताहात



शनिवारी सोपान महाराज नानवटे, रविवारी अ‍ॅड पांडुरंग महाराज लोमटे धाराशीव, सोमवारी माऊली महाराज खडकवाडीकर, मंगळवारी अविनाश महाराज घुले टाकळीकर, बुधवारी प्रभाकर महाराज झोलकर, गुरुवारी महादेव महाराज चाकरवाडीकर,वासुदेवानंद महाराज टाकळीकर यांचे काल्याचे किर्तन शुक्रवारी १२ ते २ होणार आहे. रोज पहाटे काकडा आरती,७ ते १० ज्ञानेश्वरी पारायण, ११ ते १ गाथा भजन, दुपारी अंकिता माने यांची १ ते ५ शिव कथा, सायंकाळी ६ ते ७ धुप आरती होणार आहे. तर मुख्य पालखी सोहळा शुक्रवारी रात्री १२ वाजता श्री.पापदंडेश्वर मंदिरातून निघणार असून रात्री पालखी मार्गावर भारुडे, सकाळी गवळणी व शनिवारी दुपारी महाआरती नंतर महाप्रसाद आयोजित करण्यात आला आहे. या पालखी सोहळ्यास व अखंड हरिनाम सप्ताहास पंचक्रोशीतील भाविक भक्तांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन गावकऱ्यांनी केले

## लक्ष्मण अण्णा आंधळे यांच्या वाढदिवसानिमित्त वृक्षारोपण



वडवणी : बीड जिल्हा ऊसतोड कामगारांचा जिल्हा आहे. त्यामध्ये प्रामुख्याने चाळीस ते पन्नास लाख लोक ऊसतोड मजूर करतात. महाराष्ट्र राज्य कामगार संघटनेचे तालुका सचिव लक्ष्मण अण्णा आंधळे वाढदिवसा निमित्त वृक्षारोपण करून साजरा करतात. कारण बीड जिल्ह्यामध्ये फक्त दोन टक्के जंगल व झाडाचे प्रमाण राहिले असून. बीड जिल्हा ऊसतोड मजुरांच्या हाताला काम यावं त्यांचा उस तोडणे बंद होवा यासाठी. खुप झाडे लावू आणि पर्यावरण वाचऊ , यासाठीच वृक्षरोपण करुन वाढदिवस साजरा करण्याच निर्णय घेतला ,अस मत आंधळे यांचं आहे. वाढदिवसा मध्ये डीजे पार्टी करणे, या सर्व सोडून सामाजिक उपक्रम राबवत वाढदिवस साजरा करण्यात आला. आंधळे हे वेळोवेळी सामाजिक कार्यात अग्रे सर असतात. आज तो त्यांच्या सामाजिक कार्याचा अजून एक उपक्रम आहे. हा त्यांचा उपक्रम समाजातील युवा पिढीला प्रेरणादायी आहे. असं मत देखील त्यांना व्यक्त केल.



बीड : धानोरा रोड विभागामध्ये युवा नेते रोहित गुजर यांचा वाढदिवस जल्लोषात साजरा करण्यात आला. यावेळी शिवसेनेचे जिल्हाध्यक्ष उल्हास गिराम, गुजर समाज देवसेनेचे जिल्हाध्यक्ष रतन गुजर यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी विठ्ठल आबा गुजर, हनुमान बहिरवाळ,बंटी परदेशी, सुनील गुजर, चंद्रशेखर कवडे, माने पाटील, रोहन गुजर, पवार मामा व सर्व समाज बांधव व शिवसैनिक उपस्थित होते सर्वांनी त्याला पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या

# सर्व जाती धर्माला बरोबर घेऊन जाणारा वारकरी सांप्रदाय आहे : महंत शिवाजी महाराज

नवगण राजुरी : संपत्ती कमावण्यापेक्षा मुलांवर चांगले संस्कार करा, आजची मुले ही उद्याची राष्ट्राची संपत्ती आहे. मराठवाडा ही संतांची भुमी आहे. सर्व जाती धर्माला बरोबर घेऊन जाणारा वारकरी सांप्रदाय असल्याचे प्रतिपादन श्री क्षेत्र संस्थान नारायणगडाचे मठाधिपती महंत शिवाजी महाराज यांनी केले. तर जरूड ते सिरसाळा आणि शिरापूर फाटा ते सौताडा या दोन रस्त्यासाठी शासनाकडे पाठपुरावा केला असून तो मंजूर झाला आहे. त्याची निविदा प्रक्रिया होऊन हा रस्ता देखील पूर्ण होणार असून या रस्त्यामुळे दळणवळण सुविधा सुलभ होणार असल्याचे प्रतिपादन माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांनी केले. माजी जि.प.सदस्य स्व.सौ. सुरेखाताई रविंद्र क्षीरसागर यांच्या तृतीय पुण्यस्मरणानिमित्त नवगण राजुरी येथे पंचदिनात्मक किर्तन महोत्सवाचे आयोजन आचार्य अमृताश्रम स्वामी महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले होते. या महोत्सवाची सांगता श्री क्षेत्र संस्थान नारायणगडाचे मठाधिपती ह.भ.प. प्रेममुर्ती महंत शिवाजी महाराज यांच्या काल्याच्या किर्तनाने झाली. यावेळी माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर, ह.भ.प. शिवाजी महाराज येवले, ह.भ.प. नारायण महाराज डिसले, मकरंद महाराज, रविंद्र क्षीरसागर, विलास बडगे, दिनकर कदम, नानासाहेब काकडे, सखाराम मस्के, डॉ. विठ्ठल क्षीरसागर, डॉ.योगेश क्षीरसागर, हेमंत क्षीरसागर,संपादक विजयराज बंब, अजित वरपे, बळीराम गवते, सुधाकर मिसाळ, सुभाष क्षीरसागर यांची प्रमुख उपस्थिती होती. काल्याच्या किर्तनासाठी महंत शिवाजी महाराजांनी संत तुकाराम महाराजांचा अभंग घेतला. किर्तन सांगताना महाराज पुढे म्हणाले की, आई या शब्दात मोठी ताकत आहे, आई हा व्यापक शब्द आहे, लाख गुन्हे माफ करणारे न्यायालय म्हणजे आई आहे. निस्वार्थीपणे मुलांवर प्रेम करणारी आई आहे. चांगली मुले जन्मण्यासाठी आई-वडीलांची सुध्दा पुण्याई असावी लागते. शुध्द बीजापोटी फळे रसाळ गोमटी आई-वडीलांच्या पुण्याईने भगवंत रत्न जन्माला येतात. आई तुझे थोर उपकार असे कविने म्हटले आहे. आई माझी मायेचा सागर आहे. लाभाविना प्रेम करणारी आई आहे, स्व.रेखाताईंनी राम नामाचा जप केला, अनंत कोटी पुण्य घडलेले आहे. रेखाताईंनी उत्तम किर्ती केलेली आहे ज्यांनी उत्तम किर्ती केली त्यांचे असे सोहळे साजरे होतात. भक्तीच्या मंडपामध्ये काय करायचे आणि काय करायचे नाही हे शिकायचे आहे. जसे कर्म केले तसे फळ मिळते जसं पेराल तसं उगवतं भगवान स्वतःहून भक्ताकडे जातो अशी भक्ताची भक्ती असावी. आपल्यावर राज आल्यावर राज दिलच पाहिजे असे सांगून आत्महत्या करू नका आलेल्या संकटाला सामोरं गेलं पाहिजे स्त्री-भ्र ूण हत्या करू नका.

# जागतिक वसुंधरा दिनानिमित्त पर्यावरण वाचवा वसुंधरा सजवा उपक्रमात सहभागी व्हा
## २२ एप्रिल, २०२५ ते १ मे, २०२५ या कालावधीत राज्यात विविध उपक्रम होणार

**मुंबई । प्रतिनिधी:-**

**पर्यावरणाचे संवर्धन व संरक्षण करण्यासाठी जागतिक वसुंधरा दिन म्हणजे दिनांक २२ एप्रिल, २०२५ ते महाराष्ट्र दिन म्हणजे १ मे, २०२५ या कालावधीत पर्यावरण व वातावरणीय बदल विभागाच्या वतीने राज्यात मपर्यावरण वाचवा वसुंधरा सजवाफ (पर्यावरण बचाओ वसुंधरा सजाओ) हा उपक्रम राबविण्यात येणार आहेत. या उपक्रमात सर्वांनी सहभागी व्हावे असे आवाहन पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग मंत्री पंकजा मुंडे यांनी केले आहे.मपर्यावरण वाचवा वसुंधरा सजवाफ या उपक्रमांतर्गत मंत्री पंकजा मुंडे या स्वतः २२ एप्रिल रोजी मुंबईतील पवई तलाव येथे स्वच्छता मोहिमेत सहभागी होणार आहेत. या उपक्रमात सर्व नागरिकांनी सहभागी व्हावे असे आवाहन श्रीमती मुंडे यांनीकेले आहे.नदी, नाले, तलाव स्वच्छता अभियानता सहभागी व्हावे असे आवाहन पंकजाताई मुंडे यांनी केले आहे , २२ एप्रिल हा जागतिक वसुंधरा दिवस आहे. या दिवशी आम्ही पर्यावरण व वातावरणीय बदल विभागामार्फत एक अत्यंत चांगली संकल्पना राबवत आहोत. ती संकल्पना म्हणजे जागतिक वसुंधरा दिवसाच्या पासूनम्हणजे २२ एप्रिल ते १ मे महाराष्ट्र दिनापर्यंत विविध उपक्रम राबविण्यात येणार आहेत. जसं आपण नवरात्र साजरा करतो, नऊ दिवस देवीच्या विविध रूपांची पूजा करतो, आराधना करतो, तसंच वसुंधरेची आराधना करण्यासाठी हे नऊ दिवस विविध कार्यक्रम आपण सर्वांनी राबवावेत.२२ एप्रिल रोजी या कार्यक्रमाची सुरुवात होणार आहे. मी स्वतः २२ एप्रिल न रोजी पवई लेक मुंबई येथून स्वच्छतेची सुरुवात करणार आहे. दि. २२, २३ आणि २४ एप्रिल रोजी आपण सर्वांनी आपापल्या भागातील, आपल्या गावातील, आपल्या तालुक्यातील, आपल्या जिल्ह्यातील, आपल्या महानगरातील नगरातील पाण्याचे विविध स्त्रोत साफ करायचे आहेत. नद्या, नाले, तलाव ह्यांची स्वच्छता करायचे आहे. ग्रामपंचायतीच्या ग्रामसेवकापासून ते जिल्हा परिषद सीईओपर्यंत, तलाठ्यापासून ते जिल्हाधिकारीपर्यंत , ग्रामपंचायतच्या सरपंच, सदस्यापासून ते जिल्हा परिषद अध्यक्षापर्यंत आणि आमदार, खासदार, पालकमंत्री सर्वांनी यामध्ये सहभाग घ्यावा, असे आवाहन मुंडे यांनी**



**केले आहे.याबरोबर शासकीय यंत्रणासमवेत वेगवेगळ्या संघटना, स्वयंसेवी संस्था यांनी देखील याच्यामध्ये सहभाग घ्यावा. नदी नाले, सरोवर स्वच्छ करणाऱ्या लोकप्रतिनिधीचे अधिकाऱ्याचे आणि सामाजिक संस्थेचे म ूल्यमापन करून त्यांचा सुद्धा जिल्हा पातळीवर पालकमंत्र्यांच्या हस्ते ध्वजारोहणानंतर सन्मान होईल आणि राज्यभरातून अशा अत्यंत चांगल्या काम केलेल्या लोकांचा राज्यपातळीवरही सन्मान होईल, असेही त्यांनी यावेळी सांगितले. रीड्यूस, री युज आणि रिसायकल या त्रिसूत्रीचा प्रयोगऱ्यांचा होणार सत्कारत्यानंतर दि. २५, २६ आणि २७ एप्रिल या तीन संघटना, शासकीय यंत्रणा, लोकप्रतिनिधी या सर्वांनी मिळून बुज आणि रिसायकल या तत्त्वाप्रमाणे म्हणजे, आपण कुठल्याही चुकीच्या गोष्टींचा वापर कमी करणे म्हणजे रीड्यूसकरणे, त्याचबरोबर कोणत्याही चांगल्या गोष्टी ज्या आपण परत परत वापरू शकतो त्यांचा रीयूज करणे आणि कुठल्याही गोष्टी जसे पाणी रिसायकल करतो आणि ते वापरतो त्यामुळे आपण वसुंधरेचा म्हणजे पृथ्वीचा फार मोठा फायदा त्याच्यामधून होतो आणि पर्यायी आपल्याला त्याचा फायदा होत असतो. त्यामुळे या त्रिसूत्री चा वापर करावा, असे आवाहनही त्यांनी केले. पंकजाताई मुंडे म्हणाल्या की, रीड्यूस, री यूज आणि रिसायकल या तत्त्वावर कोणी जर अत्यंत चांगले प्रयोग केले असतील, तर या प्रयोगांचा सन्मान एक मे रोजी महाराष्ट्रदिनी ध्वजारोहणानंतर पालकमंत्र्यांच्या हस्ते त्या त्या न जिल्ह्यामध्ये होईल. तसेच हे प्रयोग राज्य पातळीवर मागवून यांच्यामधले न उपयुक्त प्रयोगाचे कौतुक करून त्यांचा सन्मान करण्यात येईल. तसेच अश्या प्रयोगाचा उपयोग विविध योजनामध्ये करण्याचा विचार आहे, असेही त्यांनी सांगितले.घोषवाक्य स्पर्धा घेऊन विजेत्यांना गौरविणारदि. २८, २९ व ३० एप्रिल या तीन दिवसांमध्ये सर्वांनी पर्यावरण बचाव वसुंधरा सजाव या अभियानाच्या माध्यमातून घोषवाक्य (स्लोगन) स्पर्धा घेण्यात येणार आहेत. त्यातील उत्कृष्ट घोषवाक्य तयार करणाऱ्यांचा सन्मान हा महाराष्ट्र दिनानिमित्त करण्यात येईल. तसेच या घोषवाक्याचा समावेश महाराष्ट्र दिनाच्या संचलनातदेखील करण्यात येईल. प्रत्येक जिल्ह्यामधून तीन असे घोषवाक्य घेऊन राज्यस्तरावर तीन उत्कृष्ट घोषवाक्य निवडण्यात येतील. याचा वापर महाराष्ट्राच्या पर्यावरण व वातावरणीय बदल विभागाच्या जाहिरातींमध्ये केला जाईल. उत्कृष्ट तीन घोषवाक्य करणाऱ्याचा**

This Newspaper Printed, Publisher, Editor and Owned by RAHUL MARUTIRAO WAIKAR and Printed at RAJVEER PRINTERS, Rajmata Jijau Colony, Navgan Collage, Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra) and Published At Dainik LOK AARAMBH OFFICE- House No. 01/03/862, Rajmata Jijau Colony, Navgan College Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra). Editor- RAHUL MARUTIRAO WAIKAR Mobile: 9272132450 Email : dainiklokaarambh@gmail.com

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक राहुल मारुतीराव वाईकर यांनी राजवीर प्रिंटर्स, राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि.बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक लोक आरंभ कार्यालय, हाऊस नं.०१/०३/८६२० राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि. बीड- ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. मो. ९२७२१३२४५०, संपादक: राहुल मारोतीराव वाईकर Email : dainiklokaarambh@gmail.com